दैनिक
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : २७०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१२ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

सूर्य कोपणार अंगाची लाही-लाही होणार, हे दोन दिवस धोक्याचे

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, नागपूर : गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या हवामानत झपाट्याने बदल होताना पहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी कडक उन्हाळा जाणवत होता, तापमान ४५ डिग्रीच्या वर गेले होते, मात्र त्यानंतर राज्याच्या विविध भागांना अवकाळीचा तडाखा बसला. अनेक ठिकाणी पाऊस कोसळल्यामुळे शेतमालाचे मोठे नुकसान झाले होते. मात्र आता हवामान विभागाने पुन्हा एकदा तापमान वाढणार असल्याचा इशारा दिला आहे. आयएमडीने राज्याच्या काही भागात उष्णतेचा येलो अलर्ट जारी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



विदर्भातील तापमान वाढणार

नागपूर हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी म्हटले की, 'वादळी वारे अवकाळी पावसाच्या नंतर आता विदर्भात पुन्हा सूर्य देवतेचा कोप होणार आहे. विदर्भातील सगळ्याच जिल्ह्यात तापमान वाढणार आहे. आता कुठलेही मोसमी प्रणाली बनलेली नाही त्यामुळे विदर्भातील तापमान वाढणार आहे. काही ठिकाणी दोन ते चार अंश सेल्सियस तर काही ठिकाणी चार ते पाच अंश सेल्सिअस पर्यंत तापमान वाढणार आहे.'

या जिल्ह्यांना अलर्ट जारी

पुढे बोलताना प्रवीण कुमार यांनी सांगिलते की, '१४ आणि १५ तारखेला अकोला, अमरावती, वर्धा या जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट देण्यात आलेला आहे. या भागात हीट वेव्हची शक्यता आहे. अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यातील तापमान ४४ ते ४५ अंशापर्यंत जाण्याची शक्यता आहे त्यामुळे या जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आलेला आहे. राजस्थानामध्ये प्रति चक्रवात बनला आहे, त्याच्या प्रभावामुळे त्या भागामध्ये ४६ पर्यंत तापमान गेले, तो चक्रवात हळूहळू मध्य प्रदेश कडे येणार आहे आणि त्याचा प्रभाव विदर्भावर जाणविण्याची शक्यता आहे' असंही नागपूर हवामान विभागाने म्हटलं आहे.

नंदुरबारमध्ये विक्रमी तापमानाची नोंद...

विदर्भासह उत्तर महाराष्ट्रातही तापमानात मोठी वाढ झाली आहे. नंदुरबार जिल्ह्यात उष्णतेचा कहर पहायला मिळत आहे. आज तापमानाचा पारा ४५.५ सेल्सिअस वर गेला आहे. तापमानाच्या या आकड्याने अनेक वर्षांचे उष्णतेचे विक्रम मोडले आहेत. आता पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे, त्यामुळे नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. त्याचबरोबर उष्माघात टाळण्यासाठी जिल्ह्यात विशेष कक्ष सुरू करण्यात आला आहे.

या लाडक्या बहिणींचे १५०० रुपये बंद सरकारचा तडकाफडकी निर्णय !

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची सर्वात यशस्वी योजना आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. अशातच आता लाडकी बहीण योजनेबाबत सर्वात मोठी अपडेट समोर आली आहे. लाखो लाडक्या बहिणींना आता १५०० रुपयांचा हप्ता मिळणार नाही. महायुती सरकारची अत्यंत महत्वाकांक्षी ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंतिम पडताळणी एप्रिल अखेर पूर्ण झाली. यात अपात्र ठरलेला महिलांना आता निधी मिळणार नाही. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

६६ लाख लाडक्या बहिणी अपात्र !

" राज्यातील लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. मात्र या योजनेचा लाभ काही अपात्र महिलाही घेत असल्याचे समोर आले होते. त्यामुळे सरकारने अशा महिलांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर या योजनेची अंतिम पडताळणी एप्रिल अखेर पूर्ण झाली होती. अंतिम पडताळणी नंतर ६६ लाख लाडक्या बहिणी अपात्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे आता या महिलांना आगामी हप्ता मिळणार नाही.

६६ लाख महिलांना योजनेतून वगळले जाणार

" लाडकी बहीण योजनेच्या पडताळणीनंतरचे आकडे आता समोर आले आहेत. ६६ लाख महिला अपात्र ठरल्यानंतर आता राज्यात फक्त १ कोटी ७७ लाख लाडक्या बहिणी पात्र ठरल्या आहेत. त्यामुळे आता या महिलांनाच १५०० रुपयांचा हप्ता मिळणार आहे. आता ६६ कोटी महिलांना या योजनेतून वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. मात्र अपात्र असताना लाभ घेतलेल्या या महिलांवर कोणतीही कारवाई होणार नाही. त्यामुळे काही प्रमाणात या महिलांना दिलासा मिळणार आहे.

पडताळणीनंतर राज्य सरकारला फायदा

" अंतिम पडताळणीपूर्वी राज्य सरकारला या योजनेसाठी ३ हजार ६०० कोटी रुपये खर्च येत होता. मात्र आता तब्बल ६६ लाख महिला अपात्र ठरल्यामुळे महिन्याला आता या योजनेवर २ हजार ६५५ कोटी खर्च होणार आहेत. या पडताळणीनंतर सरकारचे वर्षाला १ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. याचाच अर्थ या पडताळणीनंतर आता सरकारला मोठा आर्थिक फायदा होणार आहे. मात्र यामुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजी पसरली आहे.

बसस्थानकाअभावी प्रवाशांचे हाल !
तळपत्या उन्हात रस्त्यावरच बसची प्रतीक्षा

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.११, पालम (परभणी) : पालम तालुका होऊन अनेक वर्षे लोटली तरी अद्यापही येथे स्वतंत्र बसस्थानक उभारण्यात आलेले नाही. त्यामुळे पालम व परिसरातील प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून, तळपत्या उन्हात रस्त्यावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. यामुळे प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण दिसून येत आहे.

पालम शहर हे नांदेड–पुणे महामार्गावर असल्याने येथून दररोज लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र बसस्थानक नसल्याने प्रवाशांना कोणत्याही प्रकारची मूलभूत सुविधा उपलब्ध नाही. सध्या कडक उन्हाळा सुरू असून भर उन्हात बसची वाट पाहताना लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय, बस थांब्यासाठी निवारा आदी सुविधा नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. तसेच रस्त्यावरच बसची प्रतीक्षा करावी लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला असून प्रवाशांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पालम तालुक्यातील नागरिकांनी अनेक वेळा बसस्थानक उभारणीची मागणी केली आहे. मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस पावले उचलली गेली नसल्याची नाराजी नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे लवकरात लवकर पालम येथे सुसज्ज बसस्थानक उभारण्यात यावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

अकोल्यात तरुण शेतमजुर दगावला; ३५० हून अधिक उष्माघाताचे रुग्ण

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.११, अकोला : विदर्भात सध्या सूर्याने आग ओकायला सुरुवात केली असून भीषण उष्णतेच्या लाटेने संपूर्ण जनजीवन होरपळून निघाले आहे. तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पार गेल्याने अकोला जिल्ह्यात एका ३० वर्षीय तरुण शेतमजुराचा उष्माघाताने दुर्दैवी मृत्यू झाला असून, यामुळे संपूर्ण विभागात खळबळ उडाली आहे. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील शिरसोली येथील श्याम इंगळे हे शेतात काम करत असताना त्यांना उष्णतेचा तीव्र फटका बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. विदर्भात उष्माघाताच्या रुग्णांचा आकडा आता ३५० च्या पार पोहोचला असून, एकट्या अकोला जिल्ह्यात ३२३ रुग्णांची नोंद झाली आहे.

प्रशासन 'अलर्ट मोड'वर : या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग आणि जिल्हा प्रशासन पूर्णपणे 'अलर्ट मोड'वर आले असून अकोल्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तातडीने उपचार कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत.

अमरावती जिल्ह्यातली स्थिती काय?

दुसरीकडे अकोल्यासोबतच अमरावती जिल्ह्यातही १० रुग्ण आढळले असून, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने कडक नियमावली (डजझ) जाहीर केली आहे. अकोला शहरात नागरिकांना भर उन्हात थांबावे लागू नये म्हणून दुपारी १२ ते ५ या वेळेत ट्रॅफिक सिग्नल बंद ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयांमध्ये १३० हून अधिक खाटा राखीव ठेवण्यात आल्या असून डॉक्टरांची पथके २४ तास तैनात आहेत.

प्रशासनाचे आवाहन : दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमानाचा पारा ४८ अंशांपर्यंत जाण्याचा इशारा दिला असल्याने, नागरिकांनी दुपारी १२ ते ५ या वेळेत घराबाहेर पडू नये, सुती कपड्यांचा वापर करावा आणि तहान नसली तरी भरपूर पाणी प्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

लाट अधिक तीव्र होणार : दरम्यान, वाढत्या उन्हामुळे शेतमजुरांच्या कामाच्या वेळाही बदलण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, विदर्भातील ही उष्णतेची लाट येत्या काही दिवसांत अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

द्वारका ते नाशिकरोडचा प्रवास होणार सुसाट!

दि.११, नाशिक : शहरातील द्वारका ते नाशिकरोड दरम्यान दहापदरी रस्ता रुंदीकरणासासाठी २२० कोटींच्या खर्चाला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात 'न्हाई'ने शुक्रवारी (दि. ८) अंतिम मंजुरी दिली. द्वारका सर्कल ते दत्त मंदिर या ६.४ किलोमीटर अंतराचे रुंदीकरण करण्यास आणि रुंदीकरणानंतर हा महामार्ग महापालिकेकडे हस्तांतरित करण्यास मंजुरी मिळाल्याने नाशिकरोड आता सुसाट होणार आहे.

शहराच्या मध्य वस्तीत द्वारका चौक हा मोठा जंक्शन बनला असून, सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर या चौकातील कोंडी फोडण्यासाठी अंडरपास तयार करण्याचे काम सुरू आहे. मात्र, नाशिक–पुणे रस्त्यावरील द्वारका ते दत्त मंदिर नाशिकरोडदरम्यान मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. नाशिकरोडसह सिन्नर, शिर्डीकडे मोठ्या प्रमाणावर वाहने जातात. परिणामी, द्वारका चौक ते दत्तमंदिर सिग्नल या दरम्यान सतत कोंडी होत असते. द्वारका चौकासह बोधलेनगर, गांधीनगर, उपनगर, नेहरूनगर परिसरातील कोंडी कायमची सुटावी, यासाठी चार वर्षांपूर्वी भारतमाला योजनेअंतर्गत द्वारका ते दत्त मंदिर उड्डाणपूल मंजूर करण्यात आला होता. मेट्रोनिओमुळे हा उड्डाणपूल अडचणीत आला होता. मेट्रोनिओ प्रकल्प जवळपास रद्द झाल्यात जमा आहे. त्यामुळे डबलडेकर पूलदेखील रद्द होणार आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी या मार्गाच्या रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव न्हाईकडे सादर केला होता. सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर या रस्ता रुंदीकरणाबाबत न्हाई आणि महापालिकेच्या प्रशासनांमध्ये अनेक बैठकी झाल्या. त्यात शुक्रवारी दिल्लीत वाहतूक व दळणवळण मंत्रालयात महापालिका आणि 'न्हाई'च्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. आयुक्त खत्री उपस्थित होत्या. बैठकीत संबंधित मंत्रालयाने द्वारका ते दत्त मंदिर या रस्त्याच्या २२० कोटींच्या कामाला अंतिम मंजुरी दिल्याने महापालिकेला दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्रात व्यावसायिक वाहन चालकास व्यवहारिक मराठी बंधनकारक

अक्षराज : संजय पंडित

दि.११, मुंबई : महाराष्ट्रात व्यवसायिक प्रवासी वाहन चालवणाऱ्या प्रत्येक चालकाला व्यवहारिक मराठी येणे अत्यावश्यक आहे. मराठी शिकणे म्हणजे कोणावर बंधन घालणे नव्हे, तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि अस्मितेचा आदर करणे आहे, असे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. रंगशारदा मंदिर येथे आयोजित हिंदी भाषिकांच्या नवभारतीय शिव वाहतूक संघटनेच्या वर्धापन दिन व जल्लोष मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, हिंदी भाषिक चालकांना स्वयंस्फूर्तीने मराठी शिकवण्यासाठी हाजी अराफत शेख यांनी केलेला अभिनव उपक्रम कौतुकास्पद आहे. अशा पद्धतीने चालक स्वतःहून पुढे येत असतील, तर शासनदेखील त्यांना सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. ते पुढे म्हणाले, चालक बांधवांनी मराठी शिकण्यासाठी तीन महिन्यांची मुदत मागितली होती. शासनाने त्यांना तब्बल १०५ दिवसांची मुदत दिली आहे. मात्र, या कालावधीत जर त्यांनी किमान ' व्यवहारिक मराठी ' आत्मसात केली नाही, तर १६ ऑगस्टपासून त्यांच्यावर कारवाई करणे अटळ ठरेल, असा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील रिक्षा, टॅक्सी, बस आणि ट्रक चालकांच्या योगदानाचा गौरव करताना मंत्री सरनाईक म्हणाले, व्यवसायिक वाहन चालक हा केवळ चालक नसून महाराष्ट्राच्या अर्थचक्राला गती देणारा खरा शिल्पकार आहे. वाहतूक क्षेत्र हे समाजाशी थेट जोडलेले असल्याने चालकांचे बोलणे,

वर्तन आणि भाषा यावर संपूर्ण व्यवस्थेची प्रतिमा अवलंबून असते, असेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची भूमी असल्याचे सांगत त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. प्रवासी वाहनात बसल्यानंतर त्याला आपल्या भाषेत संवाद साधता आला पाहिजे. 'नमस्कार', 'कुठे जायचे?', 'किती भाडे होईल?' एवढे तरी व्यवहारिक मराठी प्रत्येक चालकाला आले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

परराज्यातून महाराष्ट्रात येऊन प्रामाणिकपणे काम करणाऱ्या चालकांचे स्वागत करतानाच, स्थानिक भाषा आत्मसात केल्यास प्रवासी, पोलिस, प्रशासन आणि स्थानिक नागरिकांशी संवाद अधिक सुलभ होईल, गैरसमज कमी होतील आणि सेवा अधिक सुसंस्कृत बनेल, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. नवभारतीय शिव वाहतूक संघटनेने चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद असल्याचे सांगत, राज्य सरकारच्या माध्यमातून चालकांसाठी विविध कल्याणकारी योजना, प्रशिक्षण उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम राबवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

मराठीला विरोध म्हणून पाहू नका तर ती आपुलकीची भाषा म्हणून स्वीकारा. 'मी मराठी, तू मराठी, मराठी आमचा स्वाभिमान' ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे, असे आवाहन करत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उपस्थितांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शेवटी जय महाराष्ट्रच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमाचे आयोजन हाजी अराफत शेख यांनी केले होते.

दरम्यान, या कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर यांच्यासह हिंदी भाषिक रिक्षा व टॅक्सी चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सावित्रीच्या लेकींचे प्रेरणादायी यश!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९.. ७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४ . १४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे, दुसरी पसंती लातूर तर तिसरी पसंती बारामती ही आहे. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. जो मागील वर्षीच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली बारावीचा निकाल ९१.८८ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८० टक्के इतके आहे. केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकींची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. दहाही, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

- श्याम ठाणेदार

'वंदे मातरम्' गीताला राष्ट्रगीताचा दर्जा मिळावा..?

बंकिमचंद्र चटर्जी यांचे 'वंदे मातरम' हे राष्ट्रीय गीत आहे, परंतु त्याला 'जन गण मन' सारखा 'राष्ट्रगीता'चा दर्जा नाही. केंद्रातील मोदी सरकार या 'राष्ट्रीय गीता'ला 'राष्ट्रगीता'सारखाच दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करत आहे, त्याच मोदी सरकारचे कायम विरोधक असलेल्या काँग्रेसच्या पक्षाच्या अधिवेशनात वंदे मातरम अधिकृतरित्या पहिल्यांदा गायले गेले होते. 'वंदेमातरम' आणि 'जनगणमन' यांची भारतासाठी उपलब्ध झाली ती बंगालच्या संस्कृतीतूनच, बंकिमचंद्र चटर्जी आणि रवींद्रनाथ टागोर या दोन्ही महनीय व्यक्तीमत्वांची कर्मभूमी बंगालच राहिली आहे. मात्र बंगालमध्ये या दोन्ही गीतांच्या मुद्द्यावरून कधी वाद झाल्याचा इतिहास नाही. मग आताच वंदे मातरमच्या विषयावरून विवादाची गरज का पडली असावी? देशातील राष्ट्रीय प्रतीके, गीतांचा राजकीय वापर करण्यात सत्ताधारी वाकबगार आहेत. सुरुवातीला राष्ट्रीय मुद्रा असलेल्या अशोक स्तंभावरील तीन सिंहांना आक्रमकतेने सादर करण्यात आले. त्यानंतर सभागृहातील 'सेंगोल'मध्ये गोल'मध्ये झालेला बदल आणि आता 'राष्ट्रगीता'च्या बरोबरीने राष्ट्रीय गीताला उभे करण्यामागील केंद्राच्या सत्ताधाऱ्यांचा राजकीय हेतू लपून राहिलेला नाही. 'वंदे मातरम' हे गीत देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या प्रेरणेचे गीत असल्याने त्याचा थेट ठळक संबंध काँग्रेसच्या इतिहासाशी राहिला आहे, सत्ताधाऱ्यांच्या सांस्कृतिक इतिहासाशी नाही.

वंदे मातरम् या गीताला राष्ट्रगीतासमान दर्जा मिळाल्यास कायद्यानुसार हे गीतही नागरिकांसाठी बंधनकारक होईल, अर्थातच या

वंदे मातरम्ला देशातील काही मुस्लीम गटांचा विरोध असल्याने त्याआडून अल्पसंख्याकांना नामोहरम करण्याची केंद्राची ही खेळी आहे का, असा प्रश्न निर्माण व्हावा. देशाच्या सांस्कृतिक प्रतिकांमध्ये बदल करून केंद्राला काय साध्य करायचे आहे? महाराष्ट्रातही वारकरी सांप्रदायाच्या 'जय श्री रामकृष्ण हरी', 'पांडुरंग माऊली' किंवा ग्रामीण भागात सामान्यपणे अभिवादन करण्यासाठी बोलल्या जाणारा 'राम राम' या संबोधनासामोर 'जय श्रीराम'ची आक्रमक घोषणा उभी करण्याचा प्रयत्न करण्यामागील कारणे काय आहेत? 'वंदे मातरम' या गीताचा अर्थ भारत मातेला वंदन अशा अर्थाने कडव्या एकेश्वरवादी समुहांना अडचणीचा ठरणार आहे. त्यामुळे त्यातून आपले धार्मिक विरोधाचे राजकारण पुढे रेटण्याचा हा प्रयत्न स्पष्ट आहे.

या मुद्द्यावर केंद्रातील सभागृहात याआधीही समर्थक आणि विरोधकांमध्ये वाद झाल्याचे स्पष्ट झाले आहे. काही काळापूर्वी लेखक जावेद अख्तर यांच्यासारख्या मंडळींनी केंद्रीय सभागृहात 'भारत माता की जय' या घोषणेचे जोरदार समर्थन केले होते. या घोषणेला विरोध करणाऱ्या कडव्या स्व-धर्मवाद्यांसोबतच या मुद्द्याचे राजकारण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनाही त्यांनी खडे बोल सुनावले होते.

'भारत माता की जय'.. या ओळींमध्ये या देशाला 'माता' अर्थात आई संबोधून तिच्या विजयाची घोषणा करण्यात काही गैर नसल्याचे त्यांचे म्हणणे होते. या विधानाचा शब्दार्थ लक्षात घेतल्यास त्याला वस्तुतः विरोध करण्याचे काही कारण नव्हते. परंतु त्यावरूनही देशातील दोन कट्टरवादी गटांमध्ये गैरसमज निर्माण करून विरोधाचे राजकारण धार्मिक ध्रुवीकरणासाठी खेळले गेले होते. आता 'वंदे मातरम' च्या मुद्द्यावरूनही तसेच होत आहे. वंदे मातरम या घोषणेत 'भारत मातेला वंदन' असा अर्थ काढल्यास तसेच वंदनेचा एका अर्थाने 'पूजा' 'उपासना' किंवा 'इबादत' किंवा 'सजदा' असा इस्लाममधील मूळ अरबी शब्दांचा अर्थ घेतल्यास 'एकाच परमेश्वराची उपासना' त्यासमोरच नतमस्तक होणाऱ्या विचारसरणीसाठी अशी वंदे मातरमची घोषणा अडचणीची होऊ शकते. हे केंद्रातील सत्ताधाऱ्यांना पुरते ज्ञात आहे. यातून देशातील मुस्लिमांची कोंडी करण्याचा हा सत्ताधारी विचारसरणीचा प्रयत्न असावा. तर कडव्या मुस्लीम विचारसरणीनेही वंदन या शब्दाचा अर्थ 'सजदा' असा घेतल्यास त्यातून दोन्हीकडील परस्पविरोधी धर्मवादी राजकारणाला बळच मिळेल, हे स्पष्ट आहे.

वंदे मातरम्ला राष्ट्रगीत समकक्ष दर्जा मिळाल्यास इतर धर्मवाद्यांनाही वंदे मातरम कायद्यानुसार बोलावेच लागेल, असा 'बळजबरी' प्रयत्न केंद्राचा आहे. बरं जी मंडळी आज वंदे मातरम्ची एवढी भलामण करत आहेत, त्यांचे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाच्या मुद्द्यावर वारंवार ऐतिहासिक तथ्यांद्वारे आक्षेप घेतले गेले आहेत.

आम्ही सांगू तोच धर्म, तीच उपासना, तेच राष्ट्रप्रेम, तीच देशनिष्ठा अशी प्रमाणपत्रे वाटण्याचे अधिकार सत्ताधाऱ्यांना कोणी दिले आहेत ? सत्ता म्हणजे देश, राष्ट्र आणि धर्म आणि संविधानही नव्हे, हे या मंडळींना सांगण्याची गरज आहे. देशातील नागरिकांना प्रतीके, संबोधने, वक्तव्ये, गीतांच्या भावनिक राजकारणात अडकवून ठेवण्यापेक्षा त्यांच्या विवंचना आणि त्यांचे जगणे सुसह्य करण्याठी बरेच काही करता येऊ शकते, ज्यासाठी सत्ताधाऱ्यांना नागरिकांनी निवडून दिले आहे. देशातील नागरिकांना अर्थात भारत मातेच्या मुलांना अडचणीत, दुःखात ठेवून स्वतःच्या नावाचा जयजयकार करणे किंवा स्वतःला वंदन करवून घेणे भारतमातेलाही पटणारे नाही. अगर इस देश मे रहना होगा, तो वंदेमातरम् कहना होगा, ही हिंदुत्ववादी विचारसरणीच्या लोकांची घोषणा तर प्रसिद्धच आहेच. त्याचा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळीही वापर करण्यात आला. आता सत्तेचा प्रभाव वाढल्यामुळे काहीही करून वंदेमातरम् मुसलमानांना बोलायला भाग पाडण्याइतपत त्याचा जोश राहू नये. त्याचा अधिक व्यापक विचार करून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात जे शहीद झाले त्यात अनेक मुसलमान क्रांतिकारक होते, त्यांचाही विसर पडू देता कामा नये.

सहसंवेदना : माणुसकीचा खरा आधार

मानवी शरीर आणि मन अत्यंत संवेदनशील असते. शरीराला काही टोचले, लागले, पोळले अथवा कापले तर डोळ्यांतून पाणी येते, वेदना होतात आणि माणूस तळमळतो. ही संवेदना अर्थातच शारीरिक असते. कोणी रागाने बोलले तर आपण नाराज होतो, कोणी अपमानित केले तर शरमून जातो, कोणी द्वेष केला तर आपण चिडतो, तर कोणी विचारपूस केली नाही तर त्या व्यक्तीबद्दल नाराजी व्यक्त करतो. या सर्व मनाच्या संवेदना आहेत. या आपल्या वैयक्तिक भावना आहेत.

परंतु दुसऱ्या एखाद्या व्यक्तीबाबत आपण हीच संवेदना बाळगतो का? यालाच 'सहसंवेदना' म्हणतात. दुसऱ्याच्या पायात काटा मोडला तर आपल्यालाही दुःख वाटते; त्या व्यक्तीबद्दल कळवळा निर्माण होतो. आपण पटकन धावत जाऊन त्याचा पाय आपल्या मांडीवर घेऊन हळुवारपणे काटा काढतो, तेव्हा ती सहसंवेदनाच असते. दुसऱ्याला होणाऱ्या वेदना आपण स्वतः अनुभवतो, तेव्हा खरी संवेदना प्रकट होते.

समाजात शांतता, सुख, समृद्धी आणि प्रेम निर्माण करणारी भावना म्हणजे सहसंवेदना होय. दुसऱ्याचे दुःख हे आपले दुःख मानणे म्हणजे सहसंवेदनशील होणे. समाजातील सर्वच लोक संवेदनशील नसतात; परंतु त्यांना संवेदनशील बनवण्याचे कार्य सद्प्रवृत्तीच्या लोकांनी केले पाहिजे.

हे वर्ष महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशतकीय जयंतीचे वर्ष आहे. सहसंवेदनेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होत. अस्पृश्य लोकांना पाण्यासाठी वनवण भटकावे लागत होते, हे पाहून १८६८ साली त्यांनी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करून दिला. संवेदनशीलता आपल्या कृतीतून व्यक्त करणारे महात्मा फुले अद्वितीय होते.

१८६३ साली महात्मा फुले यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. या गृहाच्या बाहेर त्यांनी अशी पाटी लावली होती की, फसलेल्या विधवांनी येथे खुशाल बाळंत होऊन जावे. बालकांच्या निघृण हत्या थांबाव्यात, ही त्यांच्या मनातील सहसंवेदना होती आणि ती त्यांनी कृतीतून प्रकट केली. पुढे या गृहात एका विधवेला झालेल्या अनौरस मुलाला त्यांनी दत्तक घेतले व त्याचे नाव 'यशवंत' ठेवले. त्या मुलाने पुढे त्यांचा वारसा मोठ्या श्रद्धेने चालवला.

शेतकऱ्यांच्या कळवळ्याने महात्मा ज्योतिबा फुले यांनी नाडणूक आणि नागवणूक करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर आपल्या लेखणीतून आसूड ओढले. समाजातील सर्व थरांतील हीन-दीनांच्या उद्धाराची उत्कट तळमळ, त्यासाठी कोणताही धोका पत्करण्याची तयारी आणि बोलण्याप्रमाणे वागण्याचे धैर्य - हे सारे त्यांच्यातील प्रखर सहसंवेदनामुळेच होते.

येशू ख्रिस्त यांनीदेखील, मी या जगात सेवा करून घेण्यासाठी नव्हे, तर इतरांची सेवा करण्यासाठी आलो आहे, असे म्हटले आहे. त्यांनी आपल्या शिष्यांना धर्मप्रबोधनासाठी पाठवताना सांगितले होते - रोग्यांना बरे करा, कुष्ठरोग्यांची शुश्रूषा करा, मृतप्राय झालेल्यांना संजीवनी द्या, पिशाच्चबाधितांची सुटका करा आणि सेवेच्या माध्यमातून लोकांची मने जिंकून त्यांना धर्मोपदेश करा. यावरून त्यांनी आपल्या अनुयायांमध्ये सहसंवेदना जागृत करण्याचे कार्य केले होते, हे स्पष्ट होते.

परोपकार हे पुण्य आणि परपीडा हे पाप हा स्वतःमध्ये सहसंवेदना जागृत करण्याचा मूलमंत्र आहे. सहसंवेदना केवळ व्यक्ती-व्यक्तींमध्ये मर्यादित न राहता प्रत्येक सजीव प्राण्याबद्दल जागृत होणे आवश्यक आहे.

संत गाडगेबाबांची दशसूत्रीही सहसंवेदना जागृत करणारी आहे -

भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्यानागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, अंध, पंगू व रोग्यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशू-पक्षी व मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न आणि दुःखी-निराशांना हिंमत.

हे सर्व देण्याची दानत एखाद्या व्यक्तीमध्ये सहसंवेदना जागृत झाल्याशिवाय निर्माण होऊ शकत नाही.

आज जगभरात युद्ध, भूकबळी, हिंसा, महिलांवरील अत्याचार आणि पशुहत्या वाढत आहेत. हे सारे थांबवायचे असेल, तर सहसंवेदनेची ज्योत प्रत्येक व्यक्तीच्या मनात प्रज्वलित करावी लागेल. कारण सहसंवेदनाच माणुसकीचा खरा पाया आहे.

- किशोर जाधव,सोलापूर
- मो. नं. ९९२२८८२५४१

का असे?

कळली न दाहकता
युध्दाचा चटका बसे
भ्रमात मी आरामात
धुरावर विश्वास नसे

मुक्त खर्चे इंधन धन
क फल्लक हो खिसे
तुटवडा जरा दिसता
किती बनले वेडेपिसे

अपारंपरिक उर्जेकडे
दुर्लक्ष झाले का कसे
प्रबोधन गर्दभांसमोर
स्वताचेचं करतो हसे

धोरणेहवीचं कशाला
सर्वचालले आदमासे
परकीयचलनांचे प्रश्न
अर्थ व्यवस्थेला ग्रासे

जलव्यवस्थापन करे
थेंबा थेंबा जसे तरसे
प्रमाद असून आपले
परक्या टिकास्त्रबरसे

व्यंग आमचे समजले
दुजे दाखवता आरसे
घेरलो जाईतो संकटी
मनावर न घेई फारसे

- हेमंत मुसरीफ, पुणे.
९७३०३०६९९६

वाचक पत्र

संविधानाचा अवमान करणाऱ्यांना घरी बसवा!

पश्चिम बंगाल मध्ये निवडणूकीचे निकाल जाहीर झाले आणि भाजपा तेथे पूर्ण बहुमतात आली. संविधानानुसार आधीच्या मुख्यमंत्रानी आपला राजीनामा देऊन विधानसभा विसर्जित करायची असते. असेच आजवर सर्व राज्यात होत आले आहे. मात्र ममता बॅनर्जी यांनी तसें करण्यास स्पष्ट नकार दिल्याच्या बातम्या प्रसारित होत आहेत.

राज्याच्या मुख्यमंत्री जर संविधान पाळत नसतील तर त्यांचे मंत्री, कार्यकर्ते आणि त्यांना मते देऊन विजयी करणाऱ्या मतदार तरी संविधानाचा आदर करतील का? करत असतील का? हाच प्रश्न आज इतर राज्यातील जनतेला पडला आहे. यातून तेथे लोकशाही आडून हुकूमशाही अस्तिवात आहे आणि ममता दीदी म्हणतील तसंच बंगाल मध्ये घडणार अशी दडपशाही अस्तित्वात असल्याचे चित्र

आहे. मग आर जी कार रुग्णालयात एका अतिशय हुशार, होतकरू आणि प्रामाणिक वैद्यकीय विद्यार्थिनीची झालेली निर्घृण हत्या असो की TMC व्यतिरिक्त इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या भरदिवसा झालेल्या शेकडो हत्या असोत याला ममता दीदींचा पूर्ण आश्रय असावा असेच वाटते. शिवाय या रुग्णालयावर त्यांच्याच कार्यकर्त्यांनी पुरावे मिटविण्यासाठी केलेला हल्ला लोकांच्या अजूनही विस्मरणात गेलेला नाहीये.

खरेतर त्या विद्यार्थिनीची हत्या ही तेथे सुरु असलेल्या लाजिरवाण्या वैद्यकीय कृत्याला विरोध करण्याचे धाडस ती दाखवत होती यातून झालेली असल्याचे बंगाल मध्ये बोलले जातेय. मात्र याला बलात्काराचे स्वरूप देऊन दीदींचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या ईशाऱ्यावर चालणाऱ्या घोटाळ्यापासून जनतेची दिशाभूल करायची आणि निकृष्ट औषधे, इतर काळाबाजार यांचे सत्र बिनबोभाट सुरु ठेवायचे असा प्लॅन असल्याचे दिसत आहे.

जे कोणी संविधानाला मानणार नाहीत त्यांना जनता धडा शिकविते हे मात्र स्पष्ट आहे.

- सौ.स्वाती हरेर

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात

श्री शिवाजी विद्यालयात दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, बुलडाणा : श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे शैक्षणिक सत्र २०२५- २६ मध्ये इयत्ता दहावी वर्गामध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य कावरे सर प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेचे पर्यवेक्षक ढोमणे सर तसेच पालक वर्ग प्रामुख्याने उपस्थित होते. श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा दहाव्या वर्गाचा निकाल ९२% यावर्षी लागला यामध्ये प्रीती काकर या विद्यार्थिनीने शाळेमध्ये प्रथम क्रमांक मिळवताना. ८८% मिळवले तसेच पुरुषोत्तम मापारी यांनी ८७% तसेच गायत्री देवकर येणे ८५% मिळवले. तसेच ११ विद्यार्थ्यांनी ८०% वरती मार्क्स मिळाले अशा सर्व विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांनी शाळेविषयी बोलताना या ठिकाणी शाळेतील शिक्षकांनी व प्राचार्य सर यांनी कशाप्रकारे विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेतला हे सांगितले. पालकांनी शाळेमध्ये शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासावर भर दिला जाते. व शाळेबद्दल सकारात्मक भाष्य केले ढोमणे सर यांनी शाळेमध्ये शिक्षणाबरोबरच इतर उपक्रम तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी कशाप्रकारे करून घेतले जाते हे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असणारे शाळेचे प्राचार्य कावरे सर यांनी पालकांना विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी मध्ये कशाप्रकारे मार्गदर्शन केल्या जाईल तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षा विषय मार्गदर्शन केल्या जाईल हे सांगितले तसेच विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये सुद्धा श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध राहील असे प्रतिपादन केले.

दहाव्या वर्गाला शिकवणारे शिक्षक कावरे सर, हिंगे मॅडम, पालकर सर, चव्हाण सर, परिहार सर, वाघ सर, निलेश काळवाघे सर, ढोमणे सर यांचा सुद्धा शालेय प्रशासन तर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन पालकर सर यांनी केले कार्यक्रमाचे छायाचित्र वाघ सर, परिहार सर, देशमुख सर यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सब्बनवार माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९६ %

अक्षराज : प्रतिनिधी

दि.११, कुंडलवाडी : कुंडलवाडी पंचक्रोशीत सुप्रसिद्ध असलेल्या कै. गंगाबाई पोतण्णा सब्बनवार माध्यमिक विद्यालयाच्या दैदिप्यमान यशाची परंपरा याही वर्षी कायम राखत ९५.६५% इतका निकाल नोंदविला आहे.

यंदा एकूण ४६विद्यार्थिनी परीक्षेत बसल्या होत्या त्यापैकी ४४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी दहा विद्यार्थिनी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या, तर १५ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान कु . मोकळे आरती बालकिशन हिने ९१.२० % घेऊन पटकाविला आहे. कु. खांडरे शिवगंगा राजू ही ८७. ४०% गुण घेऊन शाळेतून सर्व द्वितीय आली. कु. सूर्यवंशी श्रावणी अर्जुन ही ८६.८०% घेऊन तृतीय आली.

विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कु. घंटेवाड वैष्णवी इरवंत ८६.६०% , कु. जल्दावार पूजा संजय ८६.२०% , कु. स्वामी राही सिद्धेश्वर ८२.४०% , कु. सूत्रावे अंजली साईनाथ ७८.८०% , कु. कोलंबरे संध्या प्रकाश ७८.२०% , कु. हिवराळे अपर्णा मारुतीराव ७५.२०% , कु. मदीकुंटावार वैष्णवी ७५% यांचा समावेश आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्रीमती कुसुमताई गंगाधरराव सब्बनवार, संस्थेचे सचिव डॉक्टर प्रशांत गंगाधरराव

सब्बनवार तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री कल्याण गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री नागनाथ चेटलुरे व संस्थेचे सर्व पदाधिकारी व प्राथमिक व माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाचे सर्व कर्मचारी वृंद यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जिंतूरला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापनेचा मार्ग मोकळा

वकील संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश

अक्षराज : रहीम कोक्कर

जिंतूर शहराच्या न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून जिंतूर येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापनेच्या मागणीला अखेर यश मिळण्याच्या दिशेने मोठी प्रगती झाली आहे. जिंतूर वकील संघाच्या अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या जिंतूर तालुक्यातील नागरिकांना विविध न्यायालयीन कामांसाठी परभणी येथे जावे लागत असल्याने वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा भुर्दंड सहन करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन जिंतूर वकील संघाने स्थानिक स्तरावर न्यायालय स्थापन करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता.या मागणीची गंभीर दखल घेत पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी मुंबई उच्च न्यायालयाकडे लेखी प्रस्ताव सादर केला. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस जिंतूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आर. बी. देशमुख, उपाध्यक्ष ॲड. पी. वाय. देशमुख, सचिव ॲड. बी. सी. चनसावळे, सहसचिव ॲड. डी. आर. वाळके तसेच महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे माजी उपाध्यक्ष ॲड. विजयराव देशमुख उपस्थित होते.बैठकीत तहसील कार्यालयातील दुय्यम निबंधक कार्यालयाची नवीन इमारत तात्पुरत्या स्वरूपात न्यायालयासाठी उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी यास मान्यता देत संबंधित प्रस्ताव जिल्हा न्यायालयाकडे पाठविला आहे.

दरम्यान, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी यांनी हा प्रस्ताव मुंबई उच्च न्यायालयाकडे सादर केला आहे. जिंतूर येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन झाल्यास संपूर्ण तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून न्यायालयीन सुविधा अधिक सुलभ होणार आहेत.

स्थानिक नागरिक आणि विधिज्ञ वर्तुळातून या निर्णयाचे स्वागत होत असून जिंतूरच्या न्यायिक विकासासाठी हा महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

अहिल्यानगरमध्ये मंत्री छगनराव भुजबळ यांचे उत्साहात स्वागत

सामाजिक समतेसाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज - नामदार छगनराव भुजबळ

अक्षराज : वसंत रांधवण

दि.११, अहिल्यानगर : महाराष्ट्र राज्याचे अन्न , नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व अन्य मान्यवर अहिल्यानगर येथील सुखकर्ता लॉन येथे एका कार्यक्रमासाठी आले होते. सर्व मान्यवरांचे उत्साहाने स्वागत करण्यात आले. यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. कार्यक्रम स्थळी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमात बोलताना नामदार छगन भुजबळ यांनी सामाजिक एकात्मता, शिक्षण आणि सर्वसमावेशक विकास यावर विशेष भर दिला. समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन विविध योजनांद्वारे कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने काम करण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घेत समाजहितासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

छगनराव भुजबळ यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय परंपरेचा उल्लेख करत समता, बंधुता आणि लोकशाही मूल्ये जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विविध समाजघटकांना एकत्र घेऊन विकास साधणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी सामाजिक संघटनांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात समाजोपयोगी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी छगनराव भुजबळ यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढत त्यांच्या नेतृत्वाविषयी विश्वास व्यक्त केला. कार्यक्रम शांततापूर्ण आणि उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते नागेश गवळी, प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, नंदनवन उद्योग समूहाचे दत्ता जाधव, समता परिषदेचे नेते रामदास फुले, सुखकर्ता लॉनचे संचालक भाऊसाहेब होळकर, भरत गारुडकर, प्रसाद भडके, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, समता परिषदेचे महानगर जिल्हा अध्यक्ष ब्रिजेश ताठे, माजी सभापती सुवर्णा जाधव, नंदनवन उद्योग समूहाचे बाबासाहेब जाधव, संजय जाधव, आदेश जाधव,अंबादास पुंड, सचिन दळवी, सोमनाथ पुंड, भाऊसाहेब पुंड, अशोक गवळी, भरत बोडके, भानुदास फुले व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी संयोजकाच्या वतीने उपस्थित त्यांचे आभार मानण्यात आले. नगर शहरात झालेल्या या कार्यक्रमाची राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली.

पाटण नगरपंचायतीचा कचऱ्याचा प्रश्न पेटला

अक्षराज : सुरेश संकपाळ

दि.११, पाटण (सातारा) : पाटण नगरपंचायतीचा कचरा डेपो पेटता - पेटता पेटतच राहिला आहे. यामुळे कचरा डेपो नजीक असणाऱ्या प्रभाग क्रं- ९ आणि प्रभाग क्रं- १० च्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. धुरांचे लोटच्या लोट नागरी वस्तीत पसरत आहेत. डासांचे आणि माशांचे उत्पत्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कचऱ्याच्या दुर्गंधीने नागरिक बेहाल झाले आहेत. यामुळे येथील लहान मुलं - वयोवृद्ध नागरिकांना खोकला, दमा, निमोनीया, डेंग्यू, मलेरिया आदी जिवघेणे धुरंदर आजार होत असल्याचे समोर येत आहे. पाटण शहर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी शहरातील प्रभाग क्रं- ९ आणि १० मधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात घालून त्यांच्या जीवाशी खेळ नगरपंचायतीने सुरू ठेवला आहे. डेपोतील कचऱ्याची योग्य प्रक्रिया - विल्हेवाट जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत डेपोत शहराचा कचरा टाकू देणार नाही असा पवित्रा प्रभाग क्रं- ९ आणि १० मधील नागरिकांनी घेतला आहे.

कचरा डेपो सुरु झाल्यापासून नगरपंचायती कडून कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. डास, माशा यांना रोखण्यासाठी कोणतीही औषध, किंवा केमिकल फवारणी केली जात नाही. आग लावण्याला प्रतिबंध आणले जात नाही.

शहरातील कचरा गोळा करायचा आणि तो कचरा डेपोत आणून टाकायचा. यात ओला सुका कचऱ्याचे कोणतेही विघटन वेगळेपण केले जात नाही. अशातच कचरा पेटवून द्यायचे उद्योग वाढले आहेत. धुरांचे लोटच्या लोट नागरी वस्ती गिळंकृत करत आहेत यामुळे कचरा कुजण्याचे वाढत्या प्रमाणामुळे येथे दुर्गंधी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

डास माशांचे उत्पत्ती देखील तेवढ्यात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा नाहक त्रास प्रभाग क्रं- ९ आणि १० मधील नागरिकांना होत आहे. येथील लहान मुलं - वयोवृद्ध नागरिकांना खोकला, दमा, निमोनीया, डेंग्यू, मलेरिया आदी जिवघेणे आजारांना सामोरे जावे लागत आहे.

"कचरा डेपो शेजारील शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान"

पाटण नगरपंचायतीच्या कचरा डेपोला योग्य नियोजन, कंपाऊंड, अडथळा नसल्यामुळे डेपोतील कचरा इतरत्र वाऱ्याने पसरत आहे. वाऱ्याने पसरलेला कचरा आसपासच्या शेजारील शेतात मोठ्या प्रमाणात पसरत आहे. यात प्लॅस्टिकचे प्रमाण देखील मोठे आहे. यामुळे शेजारील शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेती करताना कचऱ्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. या त्रासाला कंटाळलेल्या शेतकऱ्यांनी येथील कचरा डेपोला विरोध करुन कचरा डेपो इतरत्र हलविण्याची मागणी केली आहे.

कचरा डेपोमुळे निर्माण झालेल्या स्थानिक समस्या अनेकदा रहिवाशांनी पाटण नगरपंचायतीच्या निर्देशनास आणून दिल्या आहेत.

मात्र यावर गांभीर्याने कोणतेही धोरण अथवा नियोजन नगरपंचायती कडून झाले नाही. आता पर्यंत केवळ वेळ काढू आश्वासनच नगरपंचायती कडून देण्यात आली. अनेक वर्षे ऐकत आलेल्या मोकळ्या आश्वासनांना स्थानिक रहिवासी वैतागले असून त्यांनी कचरा डेपोत कचरा टाकण्याला प्रतिबंध केला असून येथील कचरा डेपो इतरत्र हलविण्याची मागणी केली आहे.

माथेरान हिंदू स्मशानभूमीसाठी लाकडाची तातडीने व्यवस्था करण्याची मागणी

अक्षराज : चंद्रकांत सुतार

दि.११, माथेरान : माथेरान नगरपरिषद अस्तित्वात असताना हिंदू स्मशानभूमीमध्ये अंत्यविधीसाठी लागणाऱ्या लाकडांची व्यवस्था करण्यासाठी आजही स्थानिक नागरिक आणि समाजबांधवांना वारंवार श्रमदान करावे लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्मशानभूमीतील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही नगरपालिकेची असताना गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांनाच पुढाकार घ्यावा लागत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना अंत्यविधीसाठी लागणाऱ्या लाकडांची धावपळ करावी लागते. त्यामुळे मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना मित्र परिवार यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. मृत्यूनंतरही मरणयातना अशी परिस्थिती माथेरानमध्ये निर्माण झाल्याची

भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरवेळी स्थानिक नागरिक, समाजबांधव आणि काही सामाजिक कार्यकर्ते पुढे येत जंगल परिसरातील पडलेली लाकडे गोळा करून स्मशानभूमीत उपलब्ध करून देतात. मात्र या श्रमदानामध्येही आर्थिक भार सहन करावा लागत आहे. जंगलातून लाकडे आणण्यासाठी मजुरी, वाहतूक, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर छोट्या-मोठ्या खर्चाचा भार काही ठराविक नागरिकांवर पडत असल्याचे समोर आले आहे. सध्या स्मशानभूमीतील लाकडांचा साठा जवळपास संपलेला असून काही दिवसांत पावसाळा सुरू होणार आहे. पावसाळ्यानंतर उपलब्ध होणारी लाकडे ओली असल्याने अंत्यविधीसाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आताच वन विभागाच्या सहकार्याने जंगलातील पडलेली वाळकी लाकडे जमा करून स्मशानभूमीतील गोडाऊन भरून ठेवावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर कोकणवासी समाज संस्थेच्या वतीने महिला अध्यक्षा सौ सारिका पाटील, वनिता दिघे, मनिषा शिंदे गीता खाडे, समाज कार्यकारणी सदस्य तथा नगरसेवक किशोर मोरे, केतन रामाणे यांनी मुख्याधिकारी, नगराध्यक्ष यांना लेखी निवेदन देण्यात आले असून हिंदू स्मशानभूमीसाठी अंत्यविधीस लागणाऱ्या लाकडांची तातडीने कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मुल मालधक्का प्रकल्पाला ब्रेक; आ.मुनगंटीवारांच्या पाठपुराव्याला मोठे यश

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.११, चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यातील मुल रेल्वे स्थानकाजवळ प्रस्तावित मालधक्का (गुड्स यार्ड) प्रकल्प रद्द करण्याबाबत केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक निर्णय घेतल्याने स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नवी दिल्ली येथे रेल्वेमंत्र्यांची भेट घेत या प्रश्नावर सविस्तर चर्चा केली. स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध, संभाव्य प्रदूषण आणि पर्यावरणीय परिणाम लक्षात घेता मुल येथे मालधक्का उभारला जाणार नसल्याचे रेल्वेमंत्र्यांनी स्पष्ट केले.

दिल्ली येथे पार पडलेल्या या बैठकीला भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, अजय दुबे सदस्य झेडयुआरसीसी मध्य रेल्वे मुंबई, रेल्वे विभागाचे संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुल शहरातील प्रस्तावित गुड्स यार्ड प्रकल्पामुळे आयर्न ओअर आणि इतर खनिज पदार्थांच्या लोडिंग-अनलोडिंगमुळे मोठ्या प्रमाणावर वायूप्रदूषण होण्याची शक्यता होती. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होईल, पिकांचे नुकसान होईल तसेच जलस्रोत दूषित होण्याचा धोका निर्माण होईल, अशी भूमिका आ. मुनगंटीवार यांनी रेल्वे मंत्र्यांसमोर ठामपणे मांडली.

मुल शहरातील वाढती वाहतूक, अपघातांचा धोका आणि ग्रामीण शांततेवर होणारा परिणाम लक्षात घेता हा प्रकल्प जनहिताच्या विरोधात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आ. मुनगंटीवार यांच्या या मागणीची गंभीर दखल घेत रेल्वेमंत्र्यांनी मुल शहरातील वाढती वाहतूक, अपघातांचा धोका आणि ग्रामीण शांततेवर होणारा परिणाम लक्षात घेता हा प्रकल्प जनहिताच्या विरोधात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आ. मुनगंटीवार यांच्या या मागणीची गंभीर दखल घेत रेल्वेमंत्र्यांनी संबंधित प्रकल्प त्या ठिकाणी होणार नसल्याचे स्पष्ट करत स्थानिक नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्गाला मोठा दिलासा दिला आहे.

महिला डॉ.गौरी चौरे आत्महत्या प्रकरणी गोरगाव ग्रामस्थ आक्रमक

आंदोलनाची माहिती मिळताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी तातडीने डि.वाय.एस.पी. शिरीष वमणे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची गंभीरता निदर्शनास आणून दिली. डी. वाय एस.पी. वमणे हे तातडीने पारनेर पोलीस ठाण्यात दाखल झाले व त्यांनी उपस्थित ग्रामस्थांशी चर्चा करून येत्या तीन दिवसांत संबंधित आरोपींना अटक करण्याचे स्पष्ट आश्वासन दिले.

आरोपींना अटक करण्याचे डि.वाय.एस.पी. वमणेंचे आश्वासन

अक्षराज : वसंत रांधवण

दि.११, पारनेर (अहिल्यानगर) : तालुक्यातील गोरगाव येथील महिला डॉ.गौरी सुनील चौरे आत्महत्या प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याने संतप्त नागरिकांनी आज पारनेर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन छेडले. १० दिवस उलटूनही पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत नागरिक, नातेवाईक व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यात जमा झाले होते. आरोपींना तात्काळ अटक करा तसेच पीडितेला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

महिला डॉ.गौरी चौरे हुंड्यासाठी व मानसिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू व सासऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी आरोपी अद्याप फरार असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. आंदोलनामुळे पोलीस ठाणे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने पोलिस प्रशासनाला दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली. पहिल्या निवेदनात संबंधित महिला डॉ.गौरी चौरे गोरेगांव येथे आत्महत्या केल्याचा उल्लेख करत तिच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पती, सासू व सासऱ्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आरोपी खुलेआम फिरत असून त्यामुळे पुरावे नष्ट होण्याची तसेच पीडित कुटुंबीयांवर दबाव येण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. आरोपींना त्वरित अटक करून कठोर शिक्षा करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ही देण्यात आला.

नागरिकांनी पोलीस प्रशासनाच्या विलंबित कारवाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये तत्काळ कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणात १० दिवस उलटूनही आरोपींना अटक न झाल्याने जनतेचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत होत आहे,तसेच या प्रकरणाचा वेगाने तपास करून पीडितेला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

अहिल्यानगरमध्ये 'ट्रॅव्हल जिहाद' विरोधात आ.जगताप आक्रमक

भरउन्हात हिंदू बांधव भगिनींचा रस्ता रोको

अक्षराज : वसंत रांधवण

दि.११, अहिल्यानगर : नगर-पुणे शिवशाही बसमध्ये एका मुस्लिम वाहकाने (कंडक्टर) ने हिंदू महिलेची छेड काढल्याचा प्रकार समोर आल्यानंतर अहिल्यानगरमध्ये संतापाची लाट उसळली आहे.या 'ट्रॅव्हल जिहाद' च्या नव्या प्रकारा विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) चे आमदार संग्राम जगताप यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत,शेकडो नागरिकांसह कायनेटिक चौकात 'रास्ता रोको' आंदोलन केले.भरउन्हात सुमारे तासभर चाललेल्या या आंदोलनामुळे पोलीस प्रशासनाची मोठी धावपळ उडाली.मिळालेल्या माहितीनुसार,नगर-पुणे मार्गावरील शिवशाही बसमध्ये एका मुस्लिम कंडक्टरने एका हिंदू प्रवासी महिलेचा विनयभंग केला.या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला.हा प्रकार समोर येताच आमदार संग्राम जगताप यांनी सकल हिंदू समाजाच्या वतीने तातडीने आंदोलनाचे हत्यार उपसले.

आज सकाळी रणरणत्या उन्हाची तमा न बाळगता आमदार जगताप यांच्या नेतृत्वाखाली कायनेटिक चौकात रस्ता अडवण्यात आला.या आंदोलनात मोठ्या संख्येने हिंदू महिला आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.जोपर्यंत संबंधित नराधम कंडक्टरवर गुन्हा दाखल होत नाही आणि त्याची अधिकृत प्रत हातात पडत नाही,तोवर रस्त्यावरून हटणार नाही, अशी ठाम भूमिका आ.जगताप यांनी घेतली.शेवटी पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्याची प्रत दिल्यानंतरच हे आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनावेळी उपस्थितांना संबोधित करताना आ. संग्राम जगताप यांनी अत्यंत तिखट शब्दांत प्रहार केला. ते म्हणाले नगरमध्ये लव्ह लँड आणि व्होट जिहादनंतर आता नाशिकमध्ये आयटी जिहाद आणि नगरमध्ये ट्रॅव्हल जिहाद सुरू झाला आहे. हा आपल्या भगिनींच्या सुरक्षिततेवर मोठा घाला आहे.

काशिमिरामध्ये १३ कोटी रुपयांच्या अमली पदार्थांसह व्यावसायिक एम.डी. ड्रग्जची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीला अटक

अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.११, मिरा भाईंदर : मिरा भाईंदर वसई विरार च्या पोलीस उपायुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे ह्यांनी पत्रकार परिषद दिनांक ११ मे २०२६ रोजी क्राईम ब्रांच कानकिया कार्यालयात सायं ३.३० वा. घेण्यात आली. त्यात दिनांक ०४/०४/२०२६ रोजी, मीरा रोड ईस्ट येथील नयानगर परिसरात केलेल्या कारवाईदरम्यान, पोलिसांनी श्रीमती फिरदोस अरबाज कुरेशी यांच्या निवासस्थानातून अंदाजे १ किलो ३२४ ग्रॅम एम.डी. ड्रग जप्त केले, ज्याचे बाजारमूल्य अंदाजे २,६६,१७,२८० रुपये आहे. तपासादरम्यान, हा अवैध पदार्थ त्यांचे पती अरबाज वकील कुरेशी यांचा असल्याचे उघड झाले. या प्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याच्या पुढील तपासादरम्यान, पोलिसांनी सुरवातीला एकूण १० आरोपींना अटक केली होती. तपासादरम्यान, आरोपी व्यावसायिकरित्या एम.डी. ड्रग्जची खरेदी-विक्री करत असल्याचे उघड झाले आहे.

आतापर्यंतच्या कारवाईत एकूण ६ किलो ७७३ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले असून, त्याचे अंदाजित

मूल्य १३,६१,३८,४८० रुपये आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या कक्ष क्रमांक ४ ने यशस्वीपणे पार पाडली.

पोलीस पथकाला मिळालेल्या माहिती आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचण्यात यश आले असून, गुन्हेगारांची संख्या १३ झाली आहे मोठ्या प्रमाणात अवैध पदार्थ जप्त केले आहेत.

पत्रकार वसंत रांधवण यांना, राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार जाहीर

अक्षराज : राजकुमार इकडे

दि.११, पारनेर (अहिल्यानगर) : तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी पारनेर चे भूमिपुत्र व दैनिक अक्षराज मीडियाचे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण यांना आधार फाउंडेशन व एस आर २४ न्यूज मीडिया समूह राहुरी अहिल्यानगर यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार २०२६ करीता नुकतीच निवड करण्यात आली असल्याचे आधार फाउंडेशनचे आयोजक तथा कार्याध्यक्ष रमेश खेमनर यांनी वसंत रांधवण यांना निवडीचे पत्र देऊन कळविले आहे.

शनिवार दि.१३ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी या ठिकाणी विविध क्षेत्रातील नामवंत लेखक व कवी आणि मान्यवरांच्या हस्ते आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात समाजरत्न पुरस्कार २०२६ देऊन वसंत रांधवण यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

पत्रकार वसंत रांधवण हे आहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पत्रकार असून निर्भिडपणे ग्रामीण भागातील प्रश्न मांडत आहे. गेल्या अनेक वर्षापासून पत्रकार क्षेत्रात नाविन्यपूर्ण व आदर्श पत्रकार म्हणून काम करत आहेत. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद पारनेर तालुका उपाध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहे. समाज सुधारकांची जयंती साजरी करणे, विविध शैक्षणिक सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचा मोलाचा वाटा असून मागील १७ वर्षांपासून सामाजिक कार्यात सातत्यपूर्ण योगदान आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

यापूर्वी रांधवण यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वसंत रांधवण यांना राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. या निवडीचे पत्र आधार फाउंडेशन चे सचिव सोमनाथ वाघ व आयोजक तथा कार्याध्यक्ष रमेश खेमनर यांनी दिले आहे.

शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नावर सरकार गंभीर

मुंबईतील आढावा बैठकीत जलसाठा, पूरनियंत्रण व सिंचन योजनांचा घेतला आढावा

अक्षराज : रहीम कोक्कर

दि.११, परभणी : राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जलसाठा वाढवणे, सिंचन क्षमता विस्तार करणे आणि पाण्याचे प्रभावी व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले. यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याचे निर्देश त्यांनी दिले.मुंबई येथील निर्मल भवनमध्ये एमएसआरडीसी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथुर तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीत भूजल पातळी वाढविण्यासाठी व्यापक उपाययोजनांची आवश्यकता असल्याचे

सांगण्यात आले. अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना पाटाचे पाणी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. तलाव, तळी, धरणे आणि कालव्यांच्या दुरुस्ती व सक्षमीकरणाची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

पुराचे पाणी साठविण्यावर भर दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वाहून जाणारे पावसाचे व पुराचे पाणी प्रभावीपणे साठविण्यासाठी नद्या व तलावांचे खोलीकरण, नवीन चेकडॅम व बंधारे उभारणे, नाल्यांच्या कामांमध्ये सुधारणा करणे तसेच वैज्ञानिक पद्धतीने जलसंधारणाचे नियोजन करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. पूरनियंत्रणाची कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने करण्याचे आदेश अनेक गावांना नदीच्या पुराचा धोका निर्माण होत असल्याने अशा ठिकाणी तातडीच्या आणि कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश राज्यमंत्री बोर्डीकर यांनी दिले.

गावांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पूरनियंत्रणाची कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला.जलयुक्त शिवार व गाळमुक्त धरण योजनांवर भर पाणीटंचाईची समस्या लक्षात घेता सर्व कामांचे नियमित ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले. जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबविण्याबरोबरच 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना अधिक परिणामकारक करण्याच्या सूचना देण्यात आल्या. धरणांतील गाळ शेतीसाठी वापरण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले. पाइपलाइन व ठिबक सिंचनाचा वापर वाढविण्याचे आवाहन सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी पाइपलाइनद्वारे पाणी वितरण, प्रेशर इरिगेशन, ठिबक सिंचन आणि कार्यक्षम पाणी वापर तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. बंद पाइपलाइन प्रणालीमुळे पाण्याची गळती कमी होऊन अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होईल, असे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले. सध्या अनेक गावे टँकरद्वारे पाणी पुरवठ्यावर अवलंबून असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. भविष्यात पाणी साठवण व्यवस्थेत सुधारणा झाली नाही तर आणखी गावांना टँकरची गरज भासू शकते, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून नदीपात्रांचे रुंदीकरण, गाळ काढणे आणि पावसाळ्यापूर्वी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

सुपा येथील वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर मनसे आक्रमक

अक्षराज : राजकुमार इकडे

दि.११, सुपा (अहिल्यानगर) : नगर-पुणे महामार्गावरील सुपा येथे दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. या कोंडीचा कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पारनेर तालुक्याच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उड्डाणपूल व पर्यायी मार्गाची मागणी करण्यात आली आहे मनसे तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्या-नगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सुपा येथील शासकीय विश्रामगृह ते सुपा औद्योगिक वसाहत या दरम्यान महामार्गावर दररोज वाहतुकीची कोंडी होते. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह रुग्णवाहिकांनाही तासन्तास खोळंबून राहावे लागते. इमर्जन्सीच्या वेळी याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात.

तसेच महामार्गावरील वाहतूक टाळण्यासाठी अनेक वाहने गावातील छोट्या रस्त्यांवरून जातात. त्यामुळे लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर मनसेने दोन प्रमुख मागण्या केल्या आहेत :

१. शासकीय विश्रामगृह ते सुपा MIDC पर्यंत उड्डाणपूल किंवा पर्यायी मार्ग तातडीने करण्यात यावा.

२. सुपा चौकात सर्कल व सिग्नल यंत्रणा बसवून शाळकरी विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेची व्यवस्था करावीनागरिकांच्या जीवाशी खेळ होत असताना प्रशासनाने डोळेझाक करू नये. तातडीने कार्यवाही न झाल्यास मनसे स्टाईलने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी दिला आहे यावेळी सुपा शहर अध्यक्ष अक्षय सुर्यवंशी, शाखा अध्यक्ष रमेश साबळे, पारनेर शहर अध्यक्ष सतिश म्हस्के, तालुका सचिव नारायण नरवडे, तालुका उपाध्यक्ष विरेंद्र थोरात यांच्या सह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

खापरखेडा पत्रकार संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

अक्षराज : दिवाकर घेर

दि.११, नागपूर : नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्याच्या खापरखेडा परिसरातील हूसनुर इंग्लिश स्कुल (चनकापूर) या शाळेतील विद्यार्थीनी कु.अक्षोती गौतम राम टेके हिने नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या शालांत परीक्षेत ९६.६० टक्के घेऊन सावनेर तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला तर शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कुल खापरखेडा शाळेतील विद्यार्थीनी कु.सिद्धी विजय झोलदेव हिने ९६.४९ टक्के पटकावून सावनेर तालुक्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

नक्कीच अक्षोती रामटेके व सिद्धी झोलदेव ह्या दोन विद्यार्थ्यांनी खापरखेडा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही सामाजिक बांधिलकीची जाण ठेऊन (नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न) खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी कु.अक्षोती गौतम राम टेके व कु.सिद्धी विजय झोलदेव यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचा सत्कार केला.

याप्रसंगी खापरखेडा पत्रकार संघाचे दिवाकर घेर, अमर जैन, खापरखेडा

पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर, सचिव अभय मिश्रा, उपाध्यक्ष कपिल वानखेडे, राजेश खंडारे, सहसचिव मयूर तिरपुडे, विनोद गोडबोले, कोषाध्यक्ष गिरधारी शर्मा, मार्गदर्शक मनोज डेविड, केशव पानतावणे, श्रीराम सातपुते, विक्की थापा, सादिक शेख यांच्यासह विजय झोलदेव, गौतम रामटेके आणि रामटेके व झोलदेव कुटुंबिय उपस्थित होते.